वाचले :-- १) दि लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस (रेग्यूलेशन ऑफ सप्लाय अॅन्ड डिस्ट्रीब्यूशन ) ऑर्डर २००० मधील कंडिका ९ (इ) चे परंतुक
२) सांगली जिल्हयातील गॅस वितरकांचे निवेदन दिनांक १/४/२००६
३) मा.जिल्हाधिकारी सांगली यांचेकडील दिनांक १३/६/२००७ रोजीची मंजूर टिपणी
४) शासन अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचेकडील पत्र क्रमांक घगॅस१००७/९९६ /प्र.क्र.२७५८ / ना.पु. २४ दिनांक ९ जानेवारी २००८
५) मा.जिल्हाधिकारी सांगली यांचेकडील दिनांक ४/२/२००८ रोजीची मंजूर टिपणी

---

पुरवठा-५/आरआर-१०४/२००८
जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली
दिनांक :-- ४/२/२००८

# आदेश

सांगली जिल्हयामध्ये हिंदूस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड , भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड व इंडियन ऑईल कार्पोरेशन लिमिटेड,या कंपन्याचे गॅस ग्राहकांना घरगुती गॅस सिलेंडर वितरणाचे काम संबंधित गॅस एजन्सी पाहतात. या ग्राहकांपैकी बहूसंख्य ग्राहक वितरकाच्या फ्री होम डिलीव्हरी क्षेत्रामध्ये राहात असल्यामुळे त्यांना सिलेंडर वितरणाचे काम सुरळीत चालू आहे. परंतू जे ग्राहक वितरकांच्या कार्यक्षेत्राबाहेर राहतात, त्यांच्या गॅस सिलेंडर वितरणात सुसुत्रता व सुरक्षितता यावी या दृष्टीने दर निश्चित करुन देणेबाबत वाचले क्रं २ चे निवेदन सांगली जिल्ह्यातील गॅस वितरकांनी दिलेले होते.

सांगली जिल्हयातील गॅस ग्राहकांची संख्या दिवसेदिवस वाढत असून तालुक्यातील ग्राहकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने व वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी वाहतूक खर्च मिळणेबाबत मागणी केलेली आहे. तसेच सध्या वाढलेल्या डिझेलच्या दराचा विचार करता सांगली जिल्हयातील सर्व गॅस वितरक यांना जनतेच्या सोयीसाठी त्यांच्या कार्यक्षेत्राबाहेरील भागात गॅस सिलेंडरचे वितरण करावे लागते. जिल्हयात रॉकेल कोटा एकूण मागणीच्या प्रमाणात पुरेसा उपलब्ध होत नाही. त्यामुळे ग्रामीण भागात त्या त्या उपलब्ध प्रमाणात रॉकेलचे वितरण केले जाते. यावर घरगुती वापरासाठी पर्यायी इंधन म्हणून घरगुती गॅसचा वापर ग्रामीण भागात करणे अपरिहार्य आहे. याचा विचार करता वाढलेल्या डिझेलच्या दराचा विचार करता वरील वाचले १,२ व **शासन अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचेकडील पत्र क्रमांक घगॅस१००७/९९६/प्र.क्र.२७५८/ना.पु.२४ दि. ९ जानेवारी २००८ नुसार** सांगली जिल्हयातील गॅस वितरकाच्या कार्यक्षेत्राबाहेर एलपीजी सिलेंडर ग्राहकांना घरपोच करण्यासाठी करण्यात येणा-या अतिरिक्त वाहतूकीसाठी खालील प्रमाणे जादा दर ठरवून देण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सांगली जिल्हयातील गॅस वितरकाच्या त्यांच्या कार्यक्षेत्राच्या बाहेर ग्राहकांना एलपीजी सिलेंडर घरपोच वितरीत करण्यासाठी कराव्या लागणा-या अतिरिक्त वाहतुकीसाठी खालील प्रमाणे जादा दर ठरवून देण्यात येत आहेत.

| अ.नं | अंतर | दर |
|---|---|---|
| १ | **वितरकाचे कार्यक्षेत्र** | **कोणताही जादा आकार नाही** |
| २ | **कार्यक्षेत्राबाहेर ५ कि.मी पर्यंत** | रु. १३/- |
| ३ | **कार्यक्षेत्राबाहेर ६ ते १० कि.मी पर्यंत** | रु. १५/- |
| ४ | **कार्यक्षेत्राबाहेर ११ ते १५ कि.मी पर्यंत** | रु. १७/- |
| ५ | **कार्यक्षेत्राबाहेर १६ ते २० कि.मी पर्यंत** | रु. १८/- |
| ६ | **कार्यक्षेत्राबाहेर २१ कि.मी. ते पुढे** | रु. २१/- |

**वरील दर जिल्हयातील वितरकांच्या कार्यक्षेत्राच्या बाहेर लागू राहतील.** वितरकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रा बाहेरील अंतर संबंधीत कार्यकारी अभियंता / उप अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून प्रमाणित करुन घेऊन वरील मंजूर वाहतूक दराबाबतची माहिती त्यांच्या कार्यालयात गॅसधारकांच्या माहितीसाठी दर्शनी भागात लावावी.

वरील प्रमाणे मंजूर दरापेक्षा जास्त दर आकारणी करणेत आलेस दोषी गॅस वितरका विरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ नुसार कारवाई करणेत येईल.

**शासनाचे मान्यतेने** }

सही / ××××
**जिल्हाधिकारी**
**सांगली.**

प्रती,
१) मे पाटो कनर्व्ह ---------- गॅस एजन्सी सांगली
१) सेल्स ऑफिसर (गॅस विभाग) भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड २) सेल्स ऑफिसर (गॅस विभाग) हिंदूस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड ३) सेल्स ऑफिसर (गॅस विभाग) इंडियन ऑईल कार्पोरेशन लिमिटेड यांना माहितीकरिता

प्रत ---१) मा. प्रधान सचिव,
**अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग ना. पु. २४ मंत्रालय विस्तार मुंबई.** यांना माहितीकरिता सवियन सादर
२) **मा. उप आयुक्त (पुरवठा) ,**
**पुणे विभाग पुणे,** यांना माहितीकरिता सवियन सादर
३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग मिरज / कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, (पश्चिम) सांगली यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना